# हवामान आधारीत कृषि सल्ला
# ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
# कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com

## ३८) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. १०.०७.२०२६

जिल्हा : धुळे

| मागील आठवड्यातील हवामान (०३/०६/२०२६ ते ०९/०७/२०२६) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (११/०७/२०२६ ते १५/०७/२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ | ०८ | ०९ | < दिनांक > | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| | | | | | | | पाऊस (मिमी) | ३ | २ | ० | २ | ० |
| | | | | | | | कमाल तापमान (अंसे) | ३३ | ३३ | ३४ | ३४ | ३४ |
| | | | | | | | किमान तापमान (अंसे) | २४ | २४ | २४ | २५ | २५ |
| | | | | | | | ढग स्थिती (आकाश) | ७ | ६ | ८ | ६ | ६ |
| | | | | | | | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ८१ | ७८ | ७७ | ७७ | ७७ |
| | | | | | | | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ५५ | ५३ | ५६ | ५० | ५४ |
| | | | | | | | वाऱ्याचा वेग (किमी/ तास) | २१ | २४ | २७ | २६ | २४ |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार, **पुढील पाच दिवस आकाश अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे. तसेच दि. ११, १२ व १४ जुलै रोजी काही ठिकाणी अतिशय हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे.** |
| सामान्य सल्ला | | विजेचा पुर्वानुमान मिळणेकरीता दामिनी मोबाईल अपचा वापर करावा.<br>हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमानाकरीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा. |
| संदेश | | **पेरणी योग्य पाऊस झालेल्या ठिकाणी वापसा आल्यांनतर राहिलेल्या पेरण्या पूर्ण करून घ्याव्यात.** |
| कापूस | पेरणी | **पेरणी योग्य पाऊस झाला असल्यास वापसा आल्यांनतर पेरणीकरीता खालील वाणांना प्राधान्य द्यावे आणि बीजप्रक्रिया करूनच पेरणी करावी.**<br>**वाणांची निवड:** फुले अनमोल, फुले शुभ्रा, फुले माही, फुले चेतना, फुले धारा व प्रचलीत बीटी कपाशीचे वाण<br>**बीजप्रक्रिया:** अप्रमाणित बियाण्यास कार्बाक्झिन ३७.५% + थायरम ३७.५% डब्ल्यू एस बुरशीनाशकाची प्रक्रिया प्रति किलो बियाण्यास ३.५ ग्रॅम या प्रमाणात करावी. त्यामुळे मुळकुज, जीवाणूजन्य करपा यांसारख्या रोगांचा प्रादुर्भाव कमी होतो. |
| सोयाबीन | पेरणी | **पेरणी योग्य पाऊस झाला असल्यास वापसा आल्यांनतर पेरणीकरीता खालील वाणांना प्राधान्य द्यावे आणि बीजप्रक्रिया करूनच पेरणी करावी.**<br>**वाणांची निवड:** फुले दूर्वा, फुले संगम, फुले अग्रणी, फुले किमया, फुले कल्याणी, जेएस ३३५, जेएस ९३०५<br>**बीजप्रक्रिया:** जमिनीतून प्रसार होणाऱ्या रोगांपासून संरक्षण करण्यासाठी प्रति किलो बियाणास कार्बोक्झीन ३७.५%+थायरम ३७.५% डी.एस. ३० ग्रॅम प्रति १० किलो बियाणास चोळावे त्यानंतर ॲझोक्सिस्ट्रोबीन २.५% + थायोफिनेट मिथाईल ११.२५% + थायोमिथोक्झाम २५% एफ.एस. १०० मिली किंवा थायोमिथोक्झाम ३०% एफ.एस. १०० मिली प्रति १० किलो बियाण्यास बीजप्रक्रीया करावी त्यामुळे खोड माशी पासून रोपावस्थेत पिकाचे संरक्षण होईल. |
| तूर | पेरणी | **पेरणी योग्य पाऊस झाला असल्यास वापसा आल्यांनतर पेरणीकरीता खालील वाणांना प्राधान्य द्यावे आणि बीजप्रक्रिया करूनच पेरणी करावी.**<br>**वाणांची निवड:** फुले राजेश्वरी, गोदावरी, भिमा, बीडीएन ७११, बीडीएन ७१६, फुले तृप्ती<br>**बीजप्रक्रिया:** पेरणीपूर्वी प्रतिकिलो बियाणास ५ ग्रॅम ड्रायकोडर्मा किंवा ४ ग्रॅम कार्बोक्झीन ३७.५% + थायरम ३७.५% डब्ल्यू.एस. या संयुक्त बुरशीनाशकाची बीजप्रक्रिया करावी. यानंतर प्रत्येकी २५० ग्रॅम रायझोबियम व पी.एस.बी. जिवाणु संवर्धन १० किलो बियाण्यास गुळाच्या थंड द्रावणातून चोळावे. |
| मका | पेरणी | **पेरणी योग्य पाऊस झाला असल्यास वापसा आल्यांनतर पेरणीकरीता खालील वाणांना प्राधान्य द्यावे आणि बीजप्रक्रिया करूनच पेरणी करावी.**<br>**वाणांची निवड:** राजर्षी, फुले महर्षी, आरभ<br>**बीजप्रक्रिया:** पेरणीपुर्वी २ ते २.५ ग्रॅम थायरम हे बुरशीनाशक प्रति किलो बियाण्यास चोळावे. तसेच अझोटोबक्टर जीवाणु संवर्धन २५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास चोळून नंतर पेरणी करावी. |

# हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com


| | | |
|---|---|---|
| सूर्यफूल | पेरणी | **पेरणी योग्य पाऊस झाला असल्यास वापसा आल्यांनतर पेरणीकरीता खालील वाणांना प्राधान्य द्यावे आणि बीजप्रक्रिया करूनच पेरणी करावी.**<br>**वाणांची निवड:** फुले भास्कर, फुले रवीराज<br>**बीज प्रक्रिया:** केवडा रोग टाळण्यासाठी ६ ग्रॅम मेटॅलॅक्झिल ३५ डब्ल्यू. एस. प्रति किलो बियाण्यास चोळावे. विषाणूजन्य (नॅक्रॉसिस) रोगाच्या प्रतिबंधासाठी थायामिथोक्झाम ३०% एफ.एस.१० मिली प्रति किलो बियाण्यास लावावे. त्यानंतर अॅझोटोबॅक्टर हे जिवाणू खत २५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास पेरणीपूर्वी लावावे. |
| बाजरी | पेरणी | **पेरणी योग्य पाऊस झाला असल्यास वापसा आल्यांनतर पेरणीकरीता खालील वाणांना प्राधान्य द्यावे आणि बीजप्रक्रिया करूनच पेरणी करावी.**<br>**वाणांची निवड:** धनशक्ती, फुले महाशक्ती, फुले आदिशक्ती, फुले मुक्ताई, एबीएच १२६९<br>**बीज प्रक्रिया:** बीजप्रक्रिया केलेले प्रमाणित बियाणे उपलब्ध नसल्यास पेरणीपूर्वी बियाण्यास २० टक्के मिठाच्या द्रावणाची प्रक्रिया करावी. त्यासाठी १० लिटर पाण्यात २ किलो मिठ विरघळावे. पाण्यावर तरंगणारे बुरशीयुक्त हलके बियाणे बाजुला काढून त्याचा नाश करावा व तळाला असलेले निरोगी आणि वजनाने जड असलेले बियाणे वेगळे करुन पाण्याने २ ते ३ वेळा धुवावे त्यानंतर सावलीत वाळवून पेरणीसाठी वापरावे |
| भुईमुग | पेरणी | **पेरणी योग्य पाऊस झाला असल्यास वापसा आल्यांनतर पेरणीकरीता खालील वाणांना प्राधान्य द्यावे आणि बीजप्रक्रिया करूनच पेरणी करावी.**<br>**वाणांची निवड:** फुले उन्नती, फुले भारती, फुले उनप, टीएजी २४, फुले मोरणा, फुले वारणा<br>**बीजप्रक्रिया:** बियाण्यापासून प्रादुर्भाव होणाऱ्या व रोपावस्थेत येणाऱ्या रोगापासून पिकाचे संरक्षण करण्यासाठी पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास २.५ ग्रॅम मॅन्कोझेब किंवा ४ ग्रॅम ट्रायकोडर्मा जैविक बुरशीनाशक चोळावे. नंतर एक किलो बियाण्यास २५ ग्रॅम रायझोबीयम आणि २५ ग्रॅम स्फुरद विरघळणारे जीवाणू संवर्धक (घनरूप किंवा द्रवरूप) चोळावे बीजप्रक्रीया केलेले बियाणे सावलीत सुकवून पेरावे. |

**स्त्रोत** :
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान :

ठिकाण : मफुकृवि, राहुरी.
दि. : १०.०७.२०२६

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरी तथा**
**प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.**